# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**९०) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०७.०१.२०२२**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (३१/१२/२०२१ ते ०६/०१/२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०८/०१/२०२२ ते १२/०१/२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | दिनांक | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ४ | ८ | ० | ० | ० |
| २३.४ | २८.० | २८.५ | २८.५ | २८.६ | २८.५ | २८.० | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २७ | २७ | २८ | २८ |
| १५.६ | १५.५ | १५.० | १५.६ | १४.५ | १३.५ | १४.६ | किमान तापमान (अं.से.) | १६ | १४ | १३ | १२ | १३ |
| ३.० | ३.० | ५.० | ६.० | २.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | ४ | १ | १ | ० | १ |
| ८४.० | ८३.० | ८२.० | ७३.० | ८१.० | ८२.० | ८९.० | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ८५ | ८० | ७५ | ७३ |
| ८७.० | ४९.० | ५०.० | ३४.० | ४१.० | ४४.० | ४५.० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५५ | ५० | ४८ | ४५ | ४२ |
| १०.४ | ५.७ | ४.७ | २.५ | ३.२ | २.२ | २.६ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ५ | ६ | ६ | ६ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील दोन दिवस आकाश अंशता ढगाळ राहील तसेच दि. ८ ते ९ जानेवारी रोजी काही ठिकाणी विजेच्या कडकडाटासह अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | काढणी केलेल्या मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणुक करावी.<br>पावसाचा अंदाज असल्याने फवारणी करतांना स्टीकरचा वापर करावा.<br>पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>शेतीचे कामे करताना शेतकानी कामगारानी कोरोना प्रतिबंधीत नियमाची ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल . शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत. तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे. |
| संदेश | | दि. ८ ते ९ जानेवारी रोजी काही ठिकाणी विजेच्या कडकडाटासह अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| हरभरा | फुलोरा ते घाटे भरणे | 1. हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टडरी पाच याप्रमाणे कामगंध सापळे लावावेत.<br>2. हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी हेलीओकील हे विषाणूजन्य कीटकनाशक 500 मिली 500 लिटर पाण्यातून प्रति हेक्टटर याप्रमाणे फवारणी करावी.<br>3. हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरॅनट्रीनिलीप्रोल 18.5 % एस सी 100 मिली 500 लिटर पाण्यातून प्रति हेक्टीर याप्रमाणे फवारणी करावी.शक्य असल्यास हरभरा पिकास पाणी देण्यासाठी तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा. |
| गहू | फुलोरा | 1. गहू पेरणी 60 ते 65 दिवस झाले असल्यास फुलोरा अवस्थेत असताना पिकास पाणी द्यावे.<br>2. गहू पिकावर पेरणीनंतर 55 ते 65 दिवसांनी , दोन वेळा 19:19: 19 या विद्राव्य खताची 200 ग्रॅम प्रति दहा लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>3.गहू पिकाच्या मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायमेथॉक्झाम 25 डब्ल्यू जी 50 ग्रॅम प्रति हेक्टिरी 500 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कांदा | वाढीची अवस्था | 1. कांद्यावरील फुल किडे नियंत्रणासाठी पिकावर लॅम्बडा सायलोथ्रिन 5 टक्के ई सी 6 मिली प्रती 10 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | फुलोरा ते फळ वाढ | रस शोषणाऱ्या तुडतुडे, मावा व पांढरी माशी या किडींचा प्रादुर्भाव झाल्यास नियंत्रणासाठी फॉस्फोमिडॉन 40 % एस एस 15 मिली किंवा फेनप्रोपॅथ्रिन 30 % ई. सी. कीटकनाशकाच्या प्रति 10 लिटर पाणी या प्रमाणात मिसळून आवश्यकतेनुसार आलटून पालटून फवारण्या घ्याव्यात. |
| वाटाणा | फुलोरा ते शेंगा भरणे | 1. वाटाणा पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्यास कीडग्रस्त शेंगा काढून नष्ट कराव्यात व नियंत्रणासाठी पिकावर 5 % निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| पशुसंवर्धन | | 1. किमान तापमानामध्ये घट होण्याची शक्यता असल्याने जनावरांची बसण्याची जागा ऊबदार ठेवणे गरजेचे आहे. विशेषता वासरे करडे व कोकरे यांच्या गोठ्यात रात्रीच्या वेळी तापमान वाढीसाठी 500 वॅट क्षमतेचे बल्ब लावून व सगळीकडून बारदानाच्या साह्याने बंद करावा. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल:rahuri.amfu@gmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | 2. तज्ञ पशुवैद्यकाच्या सल्ल्यानुसार जनावरांना डिसेंबर-जानेवारी महिन्यांमध्ये प्लुरोनिमोनिया (फुफ्फुसांचा दाह) या रोगांपासून प्रतिबंधासाठी लसीकरण करावे. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : ०७.०१.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरीतथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**